३) शासन निर्णय क्र.पीटीआय-१०००/२४६/व्यशि-२, दि. १५ एप्रिल,२००२ नुसार संस्थेने प्रत्यक्षात प्रवेश देण्यापूर्वी रु.१,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) एवढी अनामत रक्कम संचालकांच्या पी.एल.ए. खात्यात जमा करण्यांत यावी.

४) डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांच्या सूचनेप्रमाणे संलग्नता प्राप्त नसतांना विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत. असे प्रवेश दिल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही व परीक्षा घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील, याची संस्थेने नोंद घ्यावी.

५) या व्यतिरिक्त नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयाचे / आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

६) डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली व राज्य शासनाने / संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे / निदेशांचे पालन न केल्यास किंवा प्रवेश, संलग्नता, परीक्षा इत्यादी बाबत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता केल्यास संस्थेस दिलेली परवानगी तात्काळ रद्द करण्यांत येईल.

७) त्याचप्रमाणे डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली व संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

**ब) नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र :- (प्रपत्र "ब")**

१. प्रपत्र "ब" मधील केंद्रांना प्रायोगिक तत्त्वावर २ (दोन) वर्षे केंद्र सुरु करण्यांस परवानगी देण्यांत येत आहे, त्यानंतर केंद्रांची तपासणी करुन संचालनालयाचे स्तरावरुन केंद्राच्या प्रगतीचा अहवाल संचालनालयाकडून प्राप्त झाल्यानंतरच सदर केंद्राची परवानगी पुढे कायम ठेवण्यांत येईल. अन्यथा केंद्राची मान्यता रद्द करण्यांत येईल.

२. इतर अटी प्रपत्र "अ" प्रमाणे लागू राहतील.

**क) सध्या सुरु असलेल्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमधून नवीन व्यवसाय / जादा तुकड्यांसाठी**

१) मंजूर केलेल्या नवीन व्यवसायांसाठी संस्थेने आवश्यक त्या बाबींचे केंद्र शासनाच्या ट्रेनिंग मॅन्युअलमधील मानकानुसार १०० टक्के पूर्तता करुन आगामी होणाऱ्या स्थायी समितीतर्फे निरीक्षण करुन घेऊन सदर मंजूर नवीन व्यवसाय / जादा तुडीस डि.जी.ई.टी.नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करुन घ्यावी लागेल.

२) सदर नवीन व्यवसाय / जादा तुकड्यांना डि.जी.ई.टी.नवी दिल्ली यांची संलग्नता घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत अन्यथा प्रवेश दिल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येणार नाही. व परीक्षा घेण्यांची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील, याची संस्थेने नोंद घ्यावी.

३) शासन निर्णय क्र.पीटीआय-१०००/२४६/व्यशि-२, दि. १५ एप्रिल,२००२ नुसार संस्थेने प्रत्यक्षात प्रवेश देण्यांपर्वी रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) प्रति व्यवसाय, प्रति तुकडी एवढी अनामत रक्कम संचालकांच्या पी.एल.ए. खात्यात जमा करण्यांत यावी.

४) या व्यतिरिक्त शासनाकडून / व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयांचे / आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

५) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली व राज्य शासनाने / संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे / निदेशांचे पालन न केल्यास किंवा प्रवेश, संलग्नता, परीक्षा इत्यादी बाबत कोणत्याही